# मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग
जा. क्र. मनपा/आस्था/१०४४/२०१८
दि. २५.०९.२०१८

## विशेष कार्य अधिकारी (सेवानिवृत्त) या संवर्गातील सेवाकरार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याबाबत

## ।।जाहीर सूचना।।

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील स्थानिक संस्था कर विभागाकरिता करनिर्धारण निपटारा करण्यासाठी तसेच महानगरपालिकेच्या महसूल उत्पन्नात वाढ करण्याकरिता शासकीय/ निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांकरिता सेवाकरार पद्धतीने विशेष कार्य अधिकारी (सेवानिवृत्त) या पदासाठी इच्छुक असलेल्या तसेच अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तींवर दि. १६.१०.२०१८ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत आवक-जावक विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, तळमजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) येथे टपालाद्वारे किंवा स्वहस्ते अर्ज स्वीकारण्यात येतील. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जाचे लखोटे उघडण्यात येणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकिटावर "विशेष कार्य अधिकारी" (सेवानिवृत्त) पदाचे नाव ठळक अक्षरात नमूद करावे.

उपलब्ध पद संख्या-

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १. | विशेष कार्य अधिकारी (सेवानिवृत्त) (सेवा करार पद्धतीने) | ०५ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) राज्य शासनाकडील विक्रीकर अधिकारी (वर्ग-१)/(वर्ग-२) अथवा समकक्ष पदापेक्षा कमी नसलेला व किमान ५ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. |

अटी व शर्ती:

१) उमेदवार शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेमधून (मिरा भाईंदर महानगरपालिका वगळून) यातून सेवानिवृत्त झालेला असावा.
२) उमेदवाराचा राज्य शासनाकडील विक्रीकर अधिकारी (वर्ग-१)/(वर्ग-२) अथवा समकक्ष पदापेक्षा कमी नसलेला व किमान ५ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.
३) दि. १७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी शर्ती बंधनकारक राहतील.
४) निवड झालेल्या उमेदवाराला दि. १७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते लागू राहतील.
५) उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ही ७० वर्षापेक्षा अधिक नसावी.
६) सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ०६ महिन्यांसाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता नूतनीकरण करता येईल. परंतु एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.
७) नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने सदर काम पूर्ण करण्यास जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमीपत्र/ बंधपत्र घेण्यात येईल.
८) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.

निवड प्रक्रिया:-

- विशेष कार्य अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे नमूद शैक्षणिक अर्हतेचे अंतिम वर्षाचे गुण विचारात घेऊन गुणानुसार व अनुभवानुसार निवड करण्यात येईल.
- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

स्वाक्षरी/-
(विजयकुमार म्हसाळ)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)
जा. क्र. मनपा/पीआरओ/२७७/२०१८-१९
दि. २६.०९.१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग
जा.क्र.मनपा/आस्था/१०५३/२०१८-१९
दि. २६/९/२०१८

## सेवानिवृत्त, लेखापरीक्षण अधिकारी सेवाकरार पध्दतीने उपलब्ध करुन घेणेबाबत

## // जाहीर सूचना //

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपपालिका हे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लेखापरीक्षण विभागासाठी सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यामधून सेवाकरार पध्दतीने लेखापरीक्षण अधिकारी पदासाठी इच्छुक असलेल्या तसेच अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवाराकडून खालील अटी व शर्तीवर दि. १६/१०/२०१८ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत आवक जावक विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, तळ मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) येथे टपालाद्वारे किंवा स्वहस्ते अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जाचे लखोटे उघडण्यात येणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकिटावर ''लेखापरीक्षण अधिकारी'' पदाचे नाव ठळक अक्षरात नमूद करावे.

उपलब्ध पद संख्या -

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|
| १ | लेखापरीक्षण अधिकारी (सेवा करार पध्दतीने) | ०४ | अ) लेखा व अथवा लेखापरीक्षक पदावर काम केल्याचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक<br>ब) लेखापाल/सहा.लेखाधिकारी/सहा. लेखापरीक्षा अधिकारी अथवा उच्च पदावरील कामाचा अनुभवास प्राधान्य. |

अटी व शर्ती -

१) उमेदवार शासकीय कार्यालय / शासनाचे उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था यातून सेवानिवृत्त झालेला असावा.
२) उमेदवार लेखा व अथवा लेखापरीक्षण विभागामधील पदावर किमान १० वर्षाचा अनुभव असावा.
३) सा.प्र.वि शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३ दि. १७/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
४) सेवा निवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. अशा परिश्रमिक रक्कमांची कमाल मर्यादा मासिक रु. ४०,०००/- (रु. चाळीस हजार) इतक्या मर्यादेत असेल.
५) उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ही ७० वर्षापेक्षा अधिक नसावी.
६) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त ०६ महिन्यासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नुतनीकरण करता येईल. परंतु एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
७) नियुक्तीच्या कालावधी करार पध्दतीने सदर काम पूर्ण करुन लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याची जबावदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमी पत्र/बंध घेण्यात येईल.
८) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात / मनपामध्ये सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबतचा अधिकार / हक्क नसेल.
९) अतिरिक्त अर्हता - बी.कॉम / एम.कॉम / एम.बी.ए (फायनांस) / शासनाकडील वित्त व लेखा संवर्गातील अधिकारी / महानगरपालिकेतील लेखा / लेखापरीक्षण विभागातील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.
१०) लेखा परीक्षणांच्या कामकाजाच्या प्रत्यक्ष अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.
११) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्त्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.
१२) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

**(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)**

**सही/-**
**(विजयकुमार म्हसाळ)**
**उप.आयुक्त (मुख्यालय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जाक्र.मनपा/पीआरओ/२८६/२०१८-१९**
**दि. २६/०९/२०१८**

www.GovNokri.in